ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख २४ जानेवारी, १९५१ अंक ४

दी
## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

*[ कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली. ]*

स्थापनाः १९२६.

मुख्य कचेरी :
सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| आधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :
(१) गुजरी (२) शाहूपुरी-कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई-फोर्ट-(१०) मुंबई-मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—
मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. प. सावंत, जनरल मॅनेजर.

## दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली.

स्थापना १९२७
हेड ऑफिसः—हायस्कूल रोड, सांगली.
शाखाः—१ जत, २ मिरज.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये | १०,००,००० |
| खपलेलें „ | रुपये | २,२१,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रुपये | १,४२,००० |
| फंडस् | रुपये | १,२३,००० |
| खेळतें भांडवल | रुपये | १५,००,००० चे वर. |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

सरकारतर्फेः—
मे. भ. अं. वत्तरदार, B. A., चेअरमन.
मे. असि. रजिस्ट्रार को. सो. सातारा.
मे. रा. बा. आरवाडे, B. A., LL. B.
मे. ज. वि. करमरकर, सराफ.

सोसायट्यांतर्फेः—
मे. के. आ. चौगुले, B. A., LL. B.
मे. हिं. म. पाटील.
मे. रा. म. पाटील.

वैयक्तिक सभासदांतर्फेः—
मे. म. ह. गोडबोले, B. A., LL. B.
मे. सु. आ. पाटील.


करंट, सेव्हिंग्ज व कायम ठेवी स्वीकारल्या जातात.
बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

ना. पां. ठाणेदार, मॅनेजर.
भ. अं. वत्तरदार, बी. ए. चेअरमन.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



जुनी मशीन देऊन नवी घ्यावयाची असल्यास आम्ही बदली करून देतों.

### पेडणेकर आणि कं. लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी, १७२ गिरगांव रोड, मुंबई ४.

तारेचा पत्ताः—PEDNECO, Bombay. फोन नं. २१७३८

## कूळ व शेतजमीन कायदा

आवृत्ती दुसरी प्रसिद्ध झाली. किं. ४ रु. कूळकायदा (१९३९) आवृत्ति ३ री किं. ३ रु., तुकडेबंदी व जमीन एकत्रीकरण कायदा किं २ रु. भाडेनियंत्रण कायदा किंमत २ रु., शेतकरी कर्जनिवारण कायदा किं. ४॥ रु., मुंबई सावकारी कायदा किं. २॥ रु., द्विभार्या-प्रतिबंधक कायदा (आवृत्ति ३ री) किंमत १ रु., हिंदु घटस्फोट कायदा किं. १ रु., खंडपावत्यांचें पुस्तक ८ आणे.

पत्ताः—लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २

दळणाच्या चक्क्या–टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधु, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

# विविध माहिती

**काटकसरीचा झपाटा**—भारत–सरकारचे अर्थमंत्रि, श्री देशमुख ह्यांनीं ७ कोटी रुपयांची बचत करणारी एक योजना तयार केली आहे. काटकसरीची कुऱ्हाड सर्वच खात्यांवर चालविण्यांत येणार आहे असें समजतें. ह्या योजनेंत परराष्ट्र खात्याच्या खर्चांत १·२२ लाख व गृह–खात्याच्या खर्चांत २५·१२ लाख रुपये कपात करण्यांत येणार आहे. सर्वांत अधिक कपात सुमारे १०९ लाख रुपये दळणवळण खात्यांत करण्यांत येणार आहे.

**भारताला धान्य देण्याची विनंति**—अमेरिकन्स फॉर डेमोक्रॅटिक ॲक्शन ह्या प्रागतिक राजकीय संस्थेनें प्रे. ट्रुमन आणि अमेरिकन काँग्रेस ह्यांना अशी विनंति केली आहे कीं २० लाख टन अन्नधान्य भारताला पाठवावें. भारतांत दुष्काळ पडण्याची भीति असल्यामुळें अशा संकटकाळीं मदत करणें आवश्यक आहे, असें ह्या संस्थेचें मत आहे.

**पाकिस्तानमधील औद्योगिक प्रदर्शन**—१९५२ च्या मार्च महिन्यांत पाकिस्तानांत एक आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. ह्या प्रदर्शनांत ३५ राष्ट्रें भाग घेणार आहेत. त्यांत सो. रशिआ आहे. गेल्या वर्षी भरलेल्या प्रदर्शनापेक्षां हें प्रदर्शन अधिक मोठ्या प्रमाणावर आणि नाविन्यपूर्ण असेल असें म्हणतात.

**साखरेचें जागतिक उत्पादन**—१९५० सालीं जगांतील साखरेचें उत्पादन ३०,००,००० शॉर्ट–टनांनीं अधिक होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. एक शॉर्ट–टन म्हणजे २,००० पौंड भरतात. १९५० सालीं जगांतील साखरेचें उत्पादन ४,१०,८०,००० टन होईल. गेल्या वर्षी ३,८२,९६,००० टन साखर तयार झाली होती. १९३५–३९ ह्या पांच वर्षांतील उत्पादनाची सरासरी ३,४०,५०,००० टन होती.

**पंजाबसाठीं दुधाची भुकटी**—पंजाबमध्यें नुकत्याच होऊन गेलेल्या जलप्रलयांत सांपडलेल्या स्त्रियांना आणि मुलांना देण्यासाठीं संयुक्त–राष्ट्र–संघटनेच्या बालक–विभागानें १ लाख पौंड दुधाची भुकटी दिली आहे. ही भुकटी इस्पितळें, आरोग्य केंद्रें आणि शाळा ह्यांच्यामार्फत आपद्ग्रस्तांना पुरविण्यांत येत आहे.

**शिरपूरची कागदाची गिरणी**—सध्या हैदराबाद सरकारच्या नियंत्रणाखालीं असलेली शिरपूर येथील कागदाची गिरणी बिर्ला बंधू लवकरच आपल्या ताब्यांत घेणार आहेत असें समजतें. हैदराबादचे माजी मुख्य प्रधान मीर लायकअली ह्या गिरणीचे डायरेक्टर होते. ते पाकिस्तानांत पळून गेल्यावर गिरणीवर नियंत्रण ठेवणें कठीण जाऊं लागलें होतें.

**इजिप्तच्या कापसाचे भाव कडाडले**—इजिप्तमध्यें तयार होणाऱ्या लांब धाग्याच्या कापसाचे भाव गेल्या ३० वर्षांत कधींही वाढले नव्हते इतके ते गेल्या आठवड्यांत कडाडले. ह्या भाववाढीचें कारण साठे करण्याची प्रवृत्ति असें सांगण्यांत येत आहे. ब्रिटन आणि चेकोस्लोव्हाकिआ ह्यांच्याकडून आलेली मागणीही भाव वाढण्यास कारणीभूत झाली असावी.

**भुइमुगाच्या निर्यातीला बंदी**—भुइमूग, त्याचें तेल आणि वनस्पति–तूप ह्यांच्या निर्यातीला सौराष्ट्र सरकारनें बंदी घातली आहे. १४ जानेवारीपर्यंत निर्यातीसाठीं करण्यांत आलेल्या अर्जांना अगर तत्पूर्वी देण्यांत आलेल्या परवान्यांना ही निर्यात-बंदी लागू नाहीं.

**कोरिआंतील शहरांचा नाश**—कोरिआंतील युद्धांतील प्रतिस्पर्धी लष्करांची आलटून पालटून सरशी झाली. ह्या लष्करी घडामोडींत त्या देशांतील मोठमोठ्या शहरांची राखरांगोळी झाली. ह्या बाबतींत ब्रिटनमधील ‘ मँचेस्टर गार्डिअन ’ ह्या पत्रानें पुढीलप्रमाणें मत व्यक्त केलें आहे:–“कोरिआंतील शहरें चिनी लष्कराच्या हातीं शाबूत अवस्थेंत दिलीं तर संयुक्त राष्ट्रसंघाच्या सैन्याला ‘ किंमत ’ द्यावी लागेल हें खरें. पण, कोरिआंतील शहरें पुन्हां पहिल्यापासून बांधावीं लागलीं तर जो खर्च येईल त्याचाही विचार झाला पाहिजे.”

**रेल्वे गाड्या रद्द**—ता. ८ जानेवारीपासून पूर्व–बंगाल रेल्वेनें ४२ पॅसेंजर गाड्या कोळशाच्या तुटवड्यामुळें बंद केल्या आहेत. परदेशाहून बोटीनें येणारा कोळसा वेळेवर न आल्यामुळें गाड्या तात्पुरत्या बंद ठेवाव्या लागल्या आहेत.

**बर्नार्ड शॉ ह्यांच्या अखेरच्या सह्या**—जॉर्ज बर्नार्ड शॉ ह्यांनीं आपल्या चिटणीस मिस पॅच ह्यांना तहहयात वार्षिक ५०० पौंड देण्याची व्यवस्था केली आहे. मिस पॅच ह्यांनीं “ शॉबरोबर ३० वर्षें ” ह्या नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. बर्नार्ड शॉ ह्यांनीं आजारी असतांना प्राप्तीवरील कराच्या तक्त्यावर दोन सह्या केल्या त्या शेवटच्याच, असें मि. पॅच ह्यांनीं सांगितलें.

**आर्थिक म्हण**—एका चिनी म्हणींत अर्थशास्त्राचा गाभा पुढीलप्रमाणें सांगण्यांत आला आहे. “ एखाद्या देशांतील लोकांचें सुख झाडासारखें आहे. त्या झाडाचें मूळ म्हणजे शेती. व्यापार आणि उद्योगधंदे म्हणजे त्या झाडाच्या शाखा आणि पानें होत. मुळाला धक्का पोंचला तर, पानें गळून पडतात, फांद्या तुटतात आणि झाड मरण पावतें.

**उत्तर प्रदेशांतील जमीनदारी**—उत्तर प्रदेशांतील जमीनदारी पद्धत बंद करण्याचें बिल राज्यांतील विधिमंडळांत नुकतेंच मंजूर करण्यांत आलें. राष्ट्राध्यक्षांच्या संमतीसाठीं आतां तें दिल्लीला पाठविण्यांत येईल. बिलांत एकूण ३४४ कलमें असून त्यामुळें १५० वर्षांच्या जुन्या जमीनदारी पद्धतीला कायमचा विराम देण्यांत येईल.

**ताडसाखरेवर नियंत्रण नाहीं**—ताडीपासून तयार केलेल्या साखरेवर अगर मिठाईवर किंमतीचें नियंत्रण नसल्याचें भारतीय सरकारच्या खात्यानें जाहीर केलें आहे. ह्या साखरेच्या दळणवळणावरही निर्बंध नाहीं.

**करमणूक–गृहांवरील कर**—मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशननें ता. १ एप्रिल, १९५१ पासून थिएटर्सवरील कर वसूल करण्यास सुरवात करावी असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती–गरम–रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. १४ जानेवारी, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे.

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सोव्हिएट रशिआंतील रहाणीचें मान

बंगलोर येथें नुकत्याच पार पडलेल्या इंडियन सायन्स काँग्रेसच्या अधिवेशनाला सोव्हिएट रशियाच्या शास्त्रज्ञांचें एक प्रतिनिधिमंडळ आलें होतें. ह्या मंडळानें सोव्हिएट रशिआंत चालू असलेल्या औद्योगिक विकासाची माहिती देऊन असें सांगितलें कीं, रशियांतील जनतेचें रहाणीचें मान दर वर्षी उंचावत चाललें आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्था असणाऱ्या राष्ट्रांत युद्धविषयक उत्पादनावर खर्च अधिक होत असल्यामुळें लाखो लोकांना आर्थिक आपत्ति सहन कराव्या लागत आहेत असाहि त्यांनीं दावा केला. युद्धोत्तर कालांत सोव्हिएट रशियानें दैनंदिन जीवनाला लागणाऱ्या वस्तूंच्या किंमती तीनदां कमी केल्या आहेत. परंतु रशियन रुबलची खरेदीची शक्ति आणि अमेरिकन डॉलरची खरेदीची शक्ति ह्यांचा तुलनात्मक अभ्यास केल्याशिवाय कोणत्याच देशांतील रहाणीच्या मानांचा खरा अंदाज बांधतां येणार नाहीं. अमेरिकेसारखी भांडवलशाही राष्ट्रें युद्धोत्पादनावर अधिक खर्च करीत आहेत, त्याप्रमाणें रशिआहि करीत आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या पांचव्या अधिवेशनांत रशियन परराष्ट्रमंत्री मि. व्हिशिन्स्की ह्यांनीं एका प्रसंगीं बोलतांना अमेरिकेला असें बजावलें कीं, लष्करी शक्तीपुढें घाबरण्याचा रशियावर प्रसंग कधींही येणार नाहीं. मि. व्हिशिन्स्की ह्यांच्या सूचनेवरूनहि रशिया करीत असलेल्या लष्करी खर्चाला पुष्टि मिळते. आतां असा प्रश्न आहे कीं, लष्करविषयक खर्चामुळें अमेरिकन अर्थव्यवस्थेंत जर चलनवाढ व महागाई होऊं शकते, तर तसाच प्रकार रशिआंत कां होऊं नये? गेल्या महायुद्धांतील रशियन अर्थव्यवस्थेचा इतिहास पाहिला तर तेथें वरील प्रकार झाल्याचें आढळून येतें. रशियन अर्थव्यवस्था नियोजित असल्यामुळें चलनवाढीचे पुष्कळ दुष्परिणाम समाजांतील सर्वच वर्गांना सारखेच सोसावे लागले असतील. परंतु उत्पादन आणि चलन ह्यांच्यांतील व्यस्त प्रमाणामुळें जे परिणाम होतात ते तेथेंहि दिसून आले व येतील हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. मग भारतांत आलेल्या रशियन शास्त्रज्ञांनीं केलेल्या दाव्यांत तथ्यांश कितपत आहे असें मानावें?

ह्या प्रश्नाच्या अर्थशास्त्रीय उत्तरासाठीं रशिअन अर्थव्यवस्थेच्या नियोजनाच्या वैशिष्ट्याचा विचार करणें जरूर आहे. एकूण राष्ट्रीय उत्पादनाचा किती भाग भांडवली खर्चीत गुंतवावयाचा आणि किती दैनंदिन गरजा भागविण्यासाठीं वापरावयाचा ह्यासंबंधींचा निर्णय रशिआच्या पंचवार्षिक कार्यक्रमांत अगाऊच घेतला जातो. त्यामुळें उत्पादन साधनांची वाढ आणि चरितार्थ-साधनांची वाढ कांहीं ठराविक प्रमाणांत होऊं शकते. अर्थात् एकूण अर्थव्यवस्था व औद्योगिक विकास प्रसरण पावत असतील तरच अशी वाढ होणें शक्य आहे. रशिआचा युद्धोत्तर पंचवार्षिक कार्यक्रम व्यवस्थित पार पडल्याचें जाहीर करण्यांत आलेलें आहे. १९४५–५० च्या आर्थिक कार्यक्रमांत जी औद्योगिक उद्दिष्टें समाविष्ट करण्यांत आलेलीं होतीं त्यांच्याहिपुढें मजल मारण्यांत आलेली आहे. असें रशिअन अर्थशास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. रशिआंतील जनतेचें रहाणीचें मान उंचावत असेल तर तें एकसारख्या वाढत्या उत्पादनामुळेंच शक्य झालें असलें पाहिजे. शिवाय दुसरीही एक गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे. गेल्या महायुद्धांत रशिआच्या औद्योगिक सामर्थ्याचा मोठ्या प्रमाणावर नाश झाला. हें औद्योगिक सामर्थ्य पुन्हां पहिल्या पातळीवर आणण्यांतच रशिअन आर्थिक साधनांचा मोठा भाग खर्ची पडलेला असला पाहिजे. एखाद्या मागासलेल्या देशाचा आर्थिक विकास साधतांना जे प्रश्न निर्माण होतात तेच रशिआला युद्धोत्तर काळांत सोडवावे लागले. अशा परिस्थितींत उत्पादनाची वाढ साहजिकच होत असते. तेव्हां रशिअन जनतेचें रहाणीचें मान उंचावत आहे, असें जेव्हां सांगण्यांत येतें तेव्हां अमेरिकेसारख्या देशांशीं तुलना अभिप्रेत नसून रशिआच्या पूर्वीच्या रहाणीच्या मानाशीं तुलना करावयाची असते हें लक्षांत ठेवलें पाहिजे. रशियन अर्थव्यवस्थेचें वैशिष्ट्य लक्षांत घेतां रहाणीचें मान उंचावत जाणें केवळ अशक्यच आहे असें म्हणतां येत नाहीं.

## भारत-फिनलंड व्यापारी करार

फिनलंडशीं चालणाऱ्या व्यापारांत वृद्धी व्हावी ह्या हेतूनें भारतीय सरकारनें त्या देशाशीं नुकताच एक व्यापारी करार घडवून आणला आहे. गेल्या महिन्यांत ह्या करारासंबंधींची बोलणीं दिल्ली येथें करण्यांत आलीं. मे १९४९ मध्यें भारतानें एक वर्ष मुदतीचा व्यापारी करार केला होता. त्या कराराची मुदत संपण्यापूर्वीच नवा करार करण्यांत आला असता तर उभयता देशांच्या देवघेवींत खंड पडला नसता.

१९४९–५० ह्या वर्षांत भारतानें फिनलंडकडून १·१७ कोटी रुपयांचा माल आयात केला. उलटपक्षीं फिनलंडनें भारताकडून १९ लाख रुपयांचा माल आयात केला. १९५०–५१ च्या पहिल्या सात महिन्यांतील (एप्रिल ते ऑक्टोबर) आयात निर्यातीचे आकडे अनुक्रमें असे आहेत. आयात ५४ लाख रुपये किंमतीची, निर्यात ८ लाख रुपये किंमतीची. गेल्या मे महिन्यांत ज्या व्यापारी कराराची मुदत संपली त्यांतील अटींप्रमाणें भारताला फिनलंडकडून कागदासाठीं लागणारा रांधा तयार करण्याची यंत्रसामुग्री, बॉयलर्स तयार करण्याचें साहित्य, विजेचीं उपकरणें, कागद, चहाच्या पेट्यांसाठीं लागणारें लाकूड इत्यादि माल मिळणार होता. १९४९ सालीं भारतानें फिनलंडकडून २९ लाख रुपये किंमतीचा वृत्तपत्रांना लागणारा कागद आयात केला. भारतानें फिनलंडला तंबाखू, कातडी व चामडी, रबराच्या वस्तु, मसाल्याचें सामान, तागाच्या वस्तू, चहा, कॉफी, लाख, काथ्याचे दोरखंड, तेल व तेल-बिया, कांहीं रसायनें व औषधें, इत्यादि माल पुरवला. फिनलंडसारख्या छोट्या देशाशीं व्यापार करतांना सुद्धां भारताची आयात निर्यातीपेक्षा बरीच अधिक होते हें लक्षांत घेण्यासारखें आहे. ह्या व्यापारांतील वस्तूंच्या स्वरूपाकडे पाहिल्यास फिनलंड भारतापेक्षां औद्योगिक दृष्टीनें अधिक पुढारलेला दिसतो. भारत निर्यात करीत असलेला माल सामान्यतः कच्चा असतो, हें दिसून येतें.

## सहकारी संस्थांसाठी स्थानिक भांडवलाची उभारणी आवश्यक

(श्री. वामन पुंडलीक वर्दे, कुलाबा जिल्हा सहकारी परिषदेचे अध्यक्ष)

"निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी संस्थांना लागणारा पैसा जास्तीत जास्त स्थानिकच उभारला जाणें सहकारी चळवळीच्या दृष्टीनें हितावह आहे अशी माझी दृढ समजूत आहे. पैशाकरितां सर्वस्वी बाहेरच्या संस्थांवर अवलंबून रहाणाऱ्या सहकारी संस्था ह्या दृढमूल व टिकाऊ स्वरूपाच्या होऊं शकत नाहींत असा अनुभव आहे. म्हणून या चळवळींत काम करणाऱ्या सर्व मंडळींनीं निरनिराळ्या योजना आंखून स्थानिक अनुत्पादक स्थितींत असलेलें जास्तींत जास्त भांडवल या चळवळीकडे खेचण्याचा प्रयत्न केला पाहिजे व अगदींच कमी पडेल तेवढें भांडवल बाहेरून आणावें. आज आपल्या मुंबई राज्यांत सहकारी संस्थांमार्फत करावयाच्या योजना बऱ्याच आहेत व अशा सर्व योजनांना सरकारकडून कर्जरूपानें मदत करावयाची म्हटली तरी कोट्यवधि रुपये लागतील. सरकारच्या आजच्या आर्थिक परिस्थितींत या योजना एकदम हातीं घेतां येणें व त्यांना मदत करणें शक्य नाहीं. म्हणून बचतयोजना आखून ग्रामीण व शहरी भागांतील भांडवल या चळवळीकडे आकर्षून घेतलें तर आपणांस निरनिराळ्या योजना हातीं घेण्याच्या दृष्टीनें ती एक उपयुक्त अशी गोष्ट ठरेल. परंतु या बचतयोजनांबाबत माझें ठाम मत आहे कीं या योजनांच्या सहाय्यानें उभारलेला पैसा हा प्रथम त्या भागाच्या सहकारी चळवळीच्या वाढीकडे उपयोगांत आणला गेला पाहिजे. तो प्रथम बाहेर जाऊन नंतर कर्जरूपानें परत येतां उपयोगी नाहीं. या दृष्टीनें रूरल बँकिंग एन्कायरी कमिटीनें, सहकारी संस्थांनीं नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेट एजन्सीचें काम करावें अशी जी शिफारस केली आहे ती माझ्या मतें योग्य नाहीं. कारण त्यामुळें सहकारी संस्थांना फक्त कमिशन तेवढें मिळेल; परंतु अशा तऱ्हेनें जमविलेला पैसा ज्या त्या भागाकरितां न रहातां तो केंद्रीय अशा मोठ्या योजनांकरितां उपयोगिला जाईल. म्हणून स्थानिक गरजांकरिता उपयोगांत आणून उरलेलें भांडवल सहकारी संस्थांनीं नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेटस् खरीदण्यांत गुंतवावें म्हणजे ग्रामीण भागांतील पैसा ग्रामीण सुधारणेकडे उपयोगांत आणला जाईल."

### मध्यवर्ती बँक

"निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी संस्थांना लागणारें भांडवल पुरविण्याकरितां तसेंच सहकारी संस्थांजवळील जादा शिल्लक गुंतविण्याकरतां आणि पैशाची ने-आण करण्याकरितां एका सहकारी बँकेची जरूरी असते. अशा प्रकारच्या जिल्हानिहाय मध्यवर्ती बँका मुंबई राज्यांत बऱ्याच जिल्ह्यांतून आहेत. आपल्या जिल्ह्याकरितां अशा मध्यवर्ती बँकेची स्थापना करावी किंवा मुंबई प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह बँकेमार्फत प्रचलित चालू असलेली व्यवस्था चालू ठेवावी हा प्रश्न जिल्ह्यांतील सहकारी संस्थांतील पुढाऱ्यांनीं सोडविण्याचा आहे. यासंबंधीं मी माझे विचार मांडणें सयुक्तिक नाहीं. मात्र आपल्या जिल्ह्याच्या सहकारी चळवळीच्या दृष्टीनें विचार केला तर तूर्त अशा स्वतंत्र मध्यवर्ती बँकेच्या स्थापनेस वाव आहे असें मला वाटत नाहीं. कारण अशा बँकेच्या स्थापनेस जरूर असणारें भांडवल आज उभारतां येईल किंवा कसें याबद्दल मला शंका आहे. शिवाय जिल्ह्यांतील सहकारी संस्थांची संख्या व त्यांची स्थिति विचारांत घेतली तर अशी बँक स्वावलंबी होण्याइतका व्यवहार आज मिळूं शकेल किंवा नाहीं हा एक प्रश्न आहे. मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेचें धोरण असेंच आहे कीं जिल्हानिहाय सहकारी मध्यवर्ती बँका स्थापण्याचे सहकारी पुढाऱ्यांनीं ठरविल्यास त्या जिल्ह्यांतील व्यवहाराची जबाबदारी मध्यवर्ती बँकेकडे सोपवून द्यावी.

### अधिकारी लोकाभिमुख होण्याची आवश्यकता

"आपला देश स्वतंत्र झाल्यामुळें आतां पूर्वीप्रमाणें सरकार निराळें व प्रजाजन निराळे अशी परिस्थिति राहिली नाहीं. पूर्वीच्या जमान्यांतील सरकार मुख्यतः पोलीस स्टेट होतें. आतां जनतेचें लोकराज्य अस्तित्वांत आल्यामुळें सर्वोदय (वेल्फेअर स्टेट) हें आपलें ध्येय आहे. तेव्हां "सरकार" अशी संज्ञा न वापरतां "राज्यव्यवस्था" असा शब्दप्रयोग जास्त सयुक्तिक होईल. अशा राज्यव्यवस्थेचे घटक अधिकारी हे नवीन योजना आखतांना अगर त्यांची अंमल बजावणी करतांना जितके लोकाभिमुख होऊन कार्य करतील त्या प्रमाणांत अशीं कार्ये लोकोपयुक्त होतील. राज्यव्यवस्थेचे अधिकारी यांनीं लोकांत मिसळून पुढारी मंडळींशीं चर्चा व विचारविनिमय करून त्यांचा दृष्टिकोन समजावून घेऊन व त्यांच्या अडीअडचणींचा विचार करून व आपले कामाचे हेतू व उद्देश त्यांस नीट समजावून सांगून, आपल्या कार्याची दिशा ठरविली पाहिजे; तरच तें कार्य राज्यव्यवस्थेस पोषक असें होईल. मुंबई राज्यांतील सहकारी क्षेत्रांतील ज्या योजना आखावयाच्या असतील त्याबद्दल राज्यव्यवस्थेनें सहकारी क्षेत्रांतील सहकारी संस्थांच्या केंद्रीय अशा घटक संघटनेशीं विचारविनिमय करून आपल्या कामाची आंखणी करावी म्हणजे इच्छित कार्य सुलभतेनें व त्वरित होण्यास मदत होईल."

---

### बटाट्यांचें उत्पादन वाढलें

कित्येक पिकांचे अंदाज भारत सरकार दरसाल प्रसिद्ध करीत असतें. आतां बटाट्यांच्या लागवडीचा व उत्पादनाचा अंदाज प्रथमच प्रसिद्ध करण्यांत आला आहे. त्यावरून भारतांत १९४९-५० मध्यें एकूण ५,५३,००० एकरांत बटाटा लावलेला असून त्याचें उत्पादन १४,७४,००० टन झालें. म्हणजे, लागवडीचें क्षेत्र ९·३% वाढलें आणि उत्पादनांत १२·९% वाढ झाली.

---

### कामगारांच्यासाठी दवाखाना, परंतु कामगारांचा बहिष्कार

लिव्हर ब्रदर्स (इंडिया) लि. चा साबण कारखाना व हिंदुस्थान वनस्पतीचा कारखाना ह्यांच्या कामगारांसाठीं दवाखाना सुरू करण्याचा समारंभ आरोग्यमंत्रि डॉ. गिल्डर ह्यांच्या हस्तें नुकताच झाला. परंतु समारंभावर कामगारांनीं पूर्ण बहिष्कार घातला.

---

### सिमेंटवरील नियंत्रण जाणार

सिमेंटवरील नियंत्रण रद्द करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. दक्षिण भारतांतील सिमेंटच्या कारखान्यांना सध्यां किंमतीचे बाबतींत थोडी सवलत मिळते ती त्यामुळें पुढें मिळणार नाहीं, आणि इतर कारखान्यांशीं स्पर्धा करूनच त्यांना चालावें लागेल.

### म्युनिसिपल नोकरींतील इंजिनिअर्स

म्युनिसिपालिट्यांच्या अधिकाराखालील इंजिनिअरांच्या जागा मद्रास राज्य सरकारचे नियंत्रणाखालीं आणण्याचा तेथील सरकारचा विचार आहे.

## कै. प्रा. वा. गो. काळे यांचे पुण्यस्मृतीस श्रद्धांजलि



कै. प्रा. वा. गो. काळे यांचें निधन ता. २७ जानेवारी १९४६ सालीं झालें. त्यांच्या स्मृतीस या दिवशीं श्रद्धांजलि अर्पण करण्याचा प्रघात मी आजतागायत ठेविला आहे. त्यास अनुसरून श्रद्धांजलि अर्पण करणें कर्तव्यच आहे.

कै. प्रा. वा. गो. काळे यांचें जीवन सुरवातीपासून खडतर असेंच गेलें. विद्याभ्यासासाठीं त्यांना कष्ट करावे लागले व ते संपादन करण्यासाठीं लोकाश्रयहि मिळवावा लागला. प्राप्त परिस्थितीचा त्यांनीं योग्य असा उपयोग करून घेऊन विद्याभ्यास संपादन केला असेंच नाहीं तर भावी आयुष्याची योग्य अशी मुर्तमेढही रोंवली. कै. न्या. रानडे यांचे सान्निध्याचा उत्तम प्रकारें उपयोग करून घेऊन लेखन, वाचन, विचार यांचा योग्य संग्रह केला. कै. वा. गो. काळे यांचें जीवन प्रायः विद्यादानाचें असलें तरी त्या व्यवसायातसुद्धां कष्टमय असे दिवस काढून आपली कार्यक्षमता व चोख कामगिरी बजाविण्याचा त्यांचा कटाक्ष कायम ठेवून त्यांनीं आपलें नांव शिक्षणक्षेत्रांत अजरामर करून ठेवलें.

कै. प्रा. काळे यांचें सार्वजनिक जीवन त्यांच्या अर्थशास्त्रविषयक प्रभुत्त्वामुळें, सहकारी, औद्योगिक, टॅरिफ बोर्ड, कौन्सिल ऑफ स्टेट वगैरे अनेकविध चळवळींमध्यें रममाण झालेलें होतें.

शिक्षणक्षेत्रांत काम करीत असतानांच त्यांचें लक्ष प्रथम सहकारी चळवळीकडे गेलें व तेथें त्यांनीं आपल्या कामास सुरवात करून आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा भरपूर फायदा दिला. सुमारें २५ वर्षे मुंबई प्रांतिक सहकारी चळवळीशीं ते इतके निगडित झाले होते कीं त्यांच्या जीवनांतील प्रत्येक क्षण सहकारी चळवळीच्या विचारांशीं समरस झालेला होता. सें. को. बँक, मुंबई प्रांतिक इन्स्टिटच्यूट, प्रांतिक सहकारी बँक, लँड मार्टगेज बँक, सहकारी बँकस् असोसिएशन, वगैरे विविध संस्थांचा व त्यांचा फार घनिष्ट असा संबंध आला व त्यांच्या विकासासाठीं कै. काळे यांचे बहुमोल असे श्रम कारणीं पडले आहेत.

सहकारी चळवळीबरोबरच त्यांनीं महाराष्ट्रांतील औद्योगिक विकासासाठीं फार मोठे श्रम घेऊन अनेक संस्थांच्या संस्थापनेमध्यें पुढाकार घेऊन त्यांना वैभवाचें स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न केला. यामध्यें कोठें थोडें-फार अपयश येण्याचा आभास उत्पन्न होतांच त्यांना थोडा मानसिक त्रास सहन करण्याचा प्रसंग आला. परंतु त्यास खंबीरपणानें तोंड देऊन टीकाकारांचीं तोंडें आपोआप बंद केलीं. महाराष्ट्राची औद्योगिक क्षेत्रांतील सध्याची आर्थिक परिस्थिति व त्यामध्यें अनेक लोकांना सहन करावें लागणारें दुःख आज कै. वा. गो. काळे असते तर वेळींच उपाययोजनेमुळें कदाचित् कमी झालें असतें. कै. वा. गो. काळे यांच्या मरणानंतरही त्यांचेंबद्दल कदाचित् मनांत आढी ठेवणारे असतील परंतु सध्यांची जागतिक आर्थिक परिस्थिति व मुख्यत्वें आपल्या देशाच्या राजकीय आंदोलनामुळें निर्माण झालेल्या आर्थिक परिस्थितीमध्यें कै. वा. गो. काळे यांचें व्यक्तिमत्त्व फार उपयोगी पडलें असतें, असें म्हणणें अतिशयोक्तीचें खास नाहीं.

आपल्या अलीकडील जीवनांत सहकारी चळवळीस फार मोठें स्थान प्राप्त झालें असून त्याची पुनर्रचना खंबीर पायावर होणें अगत्याचें आहे. या कामीं मुंबई सरकारनें पुढाकार घेऊन फार मोठी जबाबदारी घेतली असून त्याचें पुढारीपण आतां सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रि. धनंजयराव गाडगीळ यांजकडे आहे. प्रि. गाडगीळ यांचे आर्थिक नियोजनासंबंधीं ठाम मत असून त्या दिशांनीं ते सहकारी चळवळीस वळण लावण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या या अवघड कामांत त्यांना कै. प्रा. वा. गो. काळे यांचें सहकार्य लाभलें असतें तर त्यांची अवघड कामगिरी सोपी झाली असती. आजच्या सहकारी चळवळीच्या वाढत्या व्यापांत कै. काळे यांची उणीव फार भासत आहे. मला स्वतःला कै. प्रो. काळे ह्यांच्या कार्यपद्धतीचें सूक्ष्म अवलोकन करण्याची व त्यांचे नेतृत्त्वाखालीं काम करण्याची संधी लाभली होती, हें माझें मी भाग्य समजतों, आणि म्हणूनच त्यांच्या सारख्या कर्तव्यदक्ष व आपलें विचारपूर्वक बनविलेलें स्पष्ट मत प्रकट करून समाजाच्या आर्थिक उद्धारासाठीं झटणाऱ्या सच्या नेत्यांची उणीव मला तरी फारच भासते.

कै. वा. गो. काळे यांचे सार्वजनिक कार्यांतील समतोल व स्पष्ट विचार, तसेंच वागण्यांतील शिस्त व नीटनेटकेपणा, तसेंच अविरत कष्ट करण्याची संवय व अखंड अभ्यास यामुळें त्यांनीं आपलें जीवन नमुनेदार केलें होतें. अगदीं अखेरपर्यंत अंगीकृत कार्य कसोशीनें करून त्यांनी एक आदर्श निर्माण करून ठेवला आणि अशा या थोर, ज्ञानी व कर्तव्यतत्पर महान पुढाऱ्याचें थोडें-फार अनुकरण करणें हें त्यांचे शिष्य म्हणविणारांचें कर्तव्य नाहीं काय ?

प. रु. खाडे.

---

## ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिट्स सर्टिफिकिटें

**३½% करमाफ व्याजः १० वर्षे मुदत**

भारत सरकारनें ३½% व्याजाचीं १० वर्षे मुदतींची ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिट सर्टिफिकिटें विक्रीस काढलीं आहेत. व्याजावर इनकमटॅक्स आकारला जाणार नाहीं. व्याज वर्षांतून एकदां दिलें जाईल. १ फेब्रुवारी १९५१ पासून हीं सर्टिफिकिटें मिळूं शकतील. कमींत कमी सर्टिफिकिट १०० रुपयांचें आहे. रिझर्व्ह बँकेच्या मुंबई, कलकत्ता, दिल्ली आणि मद्रास येथील कचेऱ्या आणि इतर ठिकाणच्या सरकारी ट्रेझरीचें काम करणाऱ्या इंपिरियल बँक कचेऱ्या येथें हीं सर्टिफिकिटें मिळूं शकतील. १० वर्षांनंतर डिपॉझिटची मूळ रक्कम परत मिळेल, परंतु एका वर्षानंतर केव्हांही डिपॉझिट परत हवें असल्यास ठराविक दरानें कसर कापून घेण्यांत येईल. पब्लिक डेट ऑफिसांत हीं सर्टिफिकिटें सेफ कस्टडीसाठीं स्वीकारण्यांत येऊन त्यावरील व्याज घरपोंच मिळण्याची सोय हवी असल्यास मिळूं शकेल. कोणत्याहि व्यक्तीला जास्तींत जास्त २५ हजारांचीं सर्टिफिकिटें घेतां येतील. धर्मादाय संस्थांना १ लक्ष रु. पर्यंत रक्कम त्यांत गुंतवितां येईल.

---

**कै. प्रो. काळे स्मृतिदिनानिमित्त**

### प्रो. पी. एन. ड्रायव्हर यांचें भाषण

शनिवार, ता. २७ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां पुणें सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत सहकारी चर्चा मंडळातर्फे कै. प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्रोफेसर पी. एन्. ड्रायव्हर ह्यांचें "सहकारी शेती आणि सहकाराची साक्ष" ह्या विषयावर भाषण होणार आहे.

**कलकत्ता येथील बँक नोकर**

३० एप्रिल १९४९ रोजीं मध्यवर्ती सरकारनें एक ऑर्डिनन्स काढून, भारतांतील कित्येक बँका व त्यांचे नोकर ह्यांचेमधील तंट्याचा निवाडा करण्यासाठी ट्रायब्यूनलची नेमणूक केली. लॉइड्स बँक लि. व इंपिरियल बँक ऑफ इंडिया ह्यांनीं जे ४० नोकर कामावरून कमी केले होते त्यांना परत कामावर घ्यावे आणि परत कामावर घेण्यापूर्वीचा त्यांचा सहा महिन्यांचा पगार ह्या नोकरांना द्यावा, असा ह्या ट्रायब्यूनलनें निवाडा केला. कामावरून नोकर कमी करण्याचा आम्हांस अधिकार आहे, त्यांना सहा महिन्याचा पगार देणें बँकांवर बंधनकारक नाहीं, त्यांना परत कामावर घेणेची बँकांवर सक्ती करतां येणार नाहीं, इ. मुद्यांवर बँकांनीं कलकत्ता हायकोर्टाकडे दाद मागितली आणि ट्रायब्यूनलच्या निवाड्याची अंमलबजावणी करण्यांत येऊं नये, अशा हुकुमाची विनंती केली. परंतु हायकोर्टानें बँकांचा अर्ज फेटाळून लावला.

---

**पर्शिया जागतिक बँकेंतून बाहेर जाणार**

इंटर नॅशनल बँकेनें पर्शियाला १०,००,००० डॉलर कर्ज देण्यास नकार दिला म्हणून पर्शिया जागतिक बँकेच्या सभासदत्वाचा राजीनामा देणार आहे असें समजतें. पर्शियानें जागतिक बँकेकडे २,५०,००,००० डॉलर ठेव ठेवावयास हवी होती, पण त्यानें फक्त ५,००,००० डॉलरच ठेवलेले आहेत.

---

**ट्रायब्यूनलच्या निवाड्यावर अपील**

ऑल इंडिया इंडस्ट्रियल (बँक डिस्प्यूट्स) ट्रायब्यूनलच्या निवाड्याविरुद्ध अपील करण्यास युनायटेड कमर्शिअल बँक लि. ला सुप्रीम कोर्टाच्या डिव्हिजन बेचनें "स्पेशल" परवानगी दिली आहे. ह्या अपीलाचा निकाल लागेपर्यंत अवार्डची अंमलबजावणी तहकूब करावी, अशा आशयाच्या अर्जाचा विचार सुप्रीम कोर्ट २९ जानेवारी रोजीं करणार आहे.

---

**नव्या भांडवल-उभारणीस परवानगी**

३० जून १९५० अखेर संपलेल्या सहा महिन्यांत कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूजनें ११६ कंपन्यांना ३३ कोटी, २ लक्ष रु. चें भांडवल उभारण्यास परवानगी दिली. ११६ कंपन्यांपैकीं ६७ औद्योगिक व ४९ बिगर औद्योगिक होत्या. नव्या कंपन्यांनीं ५ कोटी रु. भांडवल-उभारणीची परवानगी मागितली. त्यांतील दोन कंपन्यांत मिळून १९ लक्ष ६७ हजार रु. चें परकीय भांडवल आलें आहे.

---

**सहकारी जनरल विमा कंपनी**

ऑल इंडिया को. फायर अँड जनरल इन्शुअरन्स सोसायटीचें उद्घाटन गेल्या आठवड्यांत मुंबई येथें मुंबईचे अर्थमंत्री, श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं केलें.

---

**उ. प्रदेशांतील साखर कामगारांचा संप**

उत्तर प्रदेशांतील २८ साखर कारखान्यांतील ५८ हजार कामगार संपावर गेले आहेत, असें समजतें.

---


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. साळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९८,२८५ |

एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

## भोर स्टेट बँक लि.

[स्थापना : १९४४]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. ३,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ता. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब ग. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. चंदुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी

पुणें कचेरी:—बुधवार प. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. (ऑ.)
मॅनेजर.

## येत्या अंदाजपत्रकाबद्दल अंदाज

( मा. म. काळे )

पुढील वर्षासाठी सादर करण्यांत येणाऱ्या अंदाजपत्रकाबद्दल कांहीं अंदाज करणें आतां शक्य झालें आहे. मध्य सरकारच्या जमाखर्चांत सुमारें रु. २० कोटींची तूट येईल असा अंदाज आहे. कारण, निसर्गानें निर्माण झालेल्या अडचणींमुळें व आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळें खर्च जास्त करावा लागला. थोडे दिवसापूर्वी अर्थमंत्री श्री. देशमुख यांनीं आजची परिस्थिति कठीण असली तरी दोन वर्षांत आर्थिक परिस्थिति सुधारावयास लागेल, अशा आशयाचे विचार व्यक्त केले आहेत. खर्चामध्यें निश्चितपणें काटकसर करण्याचें धोरण स्वीकारण्यांत येणार आहे, व त्याचा परिणाम १९५१–५२ च्या खर्चावर झालेला स्पष्टपणें दिसून येईल. नुकत्याच एस्टिमेट्स् कमिटीनें केलेल्या सूचनांचाहि खर्चाच्या परिस्थितीवर अनुकूल परिणाम काटकसर साधण्याच्या दृष्टीनें होईल. शिल्लक दाखविणारीं, निदान खर्चाची तोंड–मिळविणारीं अंदाजपत्रकें यंदा सादर केलीं जातील, असा बराच संभव दिसतो. मध्य सरकारच्या लष्करी खर्चामध्यें १५ टक्के कपात केली जाईल, असें धोरण महामंत्रि पंडित नेहरू यांनीं व्यक्त केलें आहे. काटकसर करण्याची निश्चित दृष्टि असली तरी कदाचित् चिघळत जाणारी युद्ध–परिस्थिति, हिंद व पाक यांचे परस्पर संबंध, धान्याच्या आयातीसाठी वाढलेल्या दरांत ( वहातूक व किंमत या दोनहि दृष्टींनीं ) करावा लागणारा खर्च, निर्वासितांच्या व्यवस्थेवरील खर्च, इ. गोष्टी मध्य सरकारच्या कारभारांत चिंता उत्पन्न करणाऱ्या दिसतात. तर, राज्य किंवा प्रांतिक सरकारांच्या बाबतींत दारूबंदीच्या धोरणाचा परिणाम, शिक्षणविषयक कार्यक्रमासाठी करावा लागणारा जास्त खर्च, विक्रीकराच्या नवीन व्यवस्थेमुळें कमी होणारें उत्पन्न, जमीनदारीच्या उच्चाटनासाठी काढावें लागणारें कर्ज किंवा अन्य प्रकार, मोटारींच्या करांपासून मोटार व्हिहिकल्स कमिटीच्या सूचना स्वीकारल्या गेल्यास मिळणारें कमी उत्पन्न, इ. गोष्टी प्रांतिक सरकारांच्या खर्चावर परिणाम करणाऱ्या दिसतात.

परराष्ट्रीय व्यापाराची परिस्थिति मेले कांहीं महिने सुधारत आहे, व यामुळें कस्टम्सच्या जकातींचें उत्पन्न समाधानकारक परिस्थितींत राहील असा अंदाज आहे. परंतु, उत्पादनाच्या मंदीमुळें उत्पादनावरील करापासून मिळणारें उत्पन्न किंचित् कमीहि होईल. प्राप्तीवरील कर व इतर तत्सम कर यांच्या उत्पन्नाची परिस्थिति बहुतकरून समाधानकारक राहील. हिंदचा महत्त्वाचा धंदा म्हणजे कापड तयार करण्याचा. या धंद्याच्या यांत्रिक बाजूच्या व हातमागाच्या बैठ्या स्वरूपाच्या दोनहि स्वरूपांच्या बाबतींत फार गंभीर परिस्थिति निर्माण झाली आहे, व तिचे परिणाम पुढील वर्षाच्या परिस्थितीवर जाणवल्याशिवाय रहाणार नाहींत. कदाचित् पाकिस्तानांत कापडाच्या गिरण्या निघतील ही अगदीं ताजी बातमी परिणामाच्या दृष्टीनें महत्त्वाची समजली पाहिजे.

मध्य सरकारच्या भांडवली अंदाजपत्रकांत यंदाच सुमारें रु. २४ कोटींची तूट येणार आहे. पुढील वर्षी ही तूट जास्त वाढणेंच संभवनीय आहे. प्रांतिक विकास योजनांवरहि याचा परिणाम होईल. प्रमुख बँकांनीं तात्पुरत्या व्याजाच्या दरांत नुकतीच वाढ केली आहे. हिंद सरकारहि गेलीं कांहीं वर्षे चालू असलेलें स्वस्त पैशाचें धोरण बदलून व्याजाचा दर वाढवील असें दिसतें. याचा परिणाम भांडवली खर्चाच्या परिस्थितीवर कसा होईल हें यथावकाश दिसून येईल.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.



( स्थापना १९१८ )
बचतीच्या विविध योजना
हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.
शाखा : दादर, माहीम, बेळगांव

## ब्रिटनपुढील नवीन वर्षाचे ( १९५१ चे ) प्रश्न

ब्रिटनचे अर्थमंत्री मि. गेटस्केल ता. १० जानेवारी रोजीं लंडनमधील प्रेस कॉन्फरन्समध्यें बोलतांना म्हणाले कीं, १९५० हें वर्ष ब्रिटन व स्टर्लिंग गट यांच्या बाबतींत विशेष प्रगति करणारें ठरलें. कारण, ब्रिटनमध्यें उत्पादन एका वर्षांत नऊ टक्के वाढलें, डॉलर देशांशीं व्यापार अनुकूल तफावत दाखविणारा झाला, व इतर देशांशींहि व्यापारांत अनुकूल तफावत राहिली. १९५० सालीं ब्रिटनपुढें उत्पादनशक्ति वाढविणें, मालाची अंतर्गत मागणी कमी करून उद्योगधंद्यांत जास्त भांडवलाची गुंतवणूक व निर्गत व्यापारांत वाढ साध्य करणें, आणि डॉलर–मालाची आयात कमी करून जास्त डॉलर्स मिळविण्याचा प्रयत्न करणें हे तीन मुख्य उद्देश होते व ते पूर्णपणें सफल झाले. १९४६ पासूनच्या चार वर्षांत ब्रिटनमध्यें उत्पादन ४० टक्क्यांनीं वाढलें, परंतु अमेरिकेंत याच काळांत तें १७ टक्क्यांनीं वाढलें. अर्थात् ब्रिटनची परिस्थिति दुसऱ्या महायुद्धकालीन नाशामुळें उत्पादन सुधारण्याच्या दृष्टीनें फार भिन्न होती. ब्रिटनच्या उत्पादन वाढीपैकीं २० टक्के वाढ निरनिराळ्या वाहनांच्या उत्पादनांतील वाढीमुळें शक्य झाली. कोळशाचें उत्पादन मात्र वाढलें नाहीं. शेतीच्या स्वरूपाचें उत्पादन १९४५ नंतरच्या काळांत गेल्या वर्षी ४० टक्क्यांनीं वाढलें, व विशेष वाढ मांस व दूधदुभत्याचे पदार्थ यांत दिसून आली. १९५० सालीं ब्रिटननें निरनिराळ्या उद्योगधंद्यांत २२०० दश लक्ष पौंड भांडवल गुंतविलें. १९४९ सालीं परराष्ट्रीय व्यापारांत ३८ दशलक्ष पौंडांची तूट आली होती, परंतु १९५० मध्यें २०० ते २५० पौंडांच्या दरम्यान अनुकूल तफावत उरली. वजनाच्या दृष्टीनें मालाची निर्गत १९५० या एका वर्षांत १५ टक्क्यांनीं सुधारली. उत्तर अमेरिकेशीं चालणारा निर्यात व्यापार एका वर्षांत १९४९ च्या मानानें ३६ टक्क्यांनीं सुधारला.

१९५० सालांतील सुधारणा विशेष डोळ्यांत भरण्यासारखी असली तरी सुधारणेचा ४० टक्के भाग मार्शल योजनेमुळें मिळणाऱ्या मदतीमुळें शक्य झाला होता. आतां ही मदत बंद झाली आहे. या व्यतिरिक्त १९५१ सालीं ब्रिटनला युद्धाच्या तयारीच्या कार्यक्रमासाठी डॉलर प्रदेशांतून जास्त आयात करावी लागणार आहे, व वाढत जाणाऱ्या किंमतीमुळेंहि या आयातीची किंमत वाढेल. दुसरी गोष्ट म्हणजे अमेरिका व कॅनडा यांच्याकडून मिळालेल्या कर्जाची परतफेड १९५१ पासून सुरू होणार असून यासाठी एका वर्षांत ६० दश लक्ष पौंड इतक्या किंमतीचे डॉलर्स खर्च करावे लागतील. ही परिस्थिति चालू वर्षाच्या दृष्टीनें महत्त्वाची तर आहेच, परंतु याशिवाय आयात मालाच्या सारख्या वाढत जाणाऱ्या किंमती, कच्च्या मालाचा तुटवडा, व युद्ध साहित्य इ. तयार करावें लागल्यामुळें ब्रिटनमधील इतर उद्योगधंद्यांवर होणारा परिणाम याहि गोष्टींना देशाला तोंड द्यावें लागणार आहे; परंतु गेल्या एका वर्षांत मूलभूत आर्थिक परिस्थितींत साध्य केलेल्या प्रगतीमुळें याहि स्थितीला मि. गेटस्केल यांच्या मतें ब्रिटन तोंड देऊं शकेल.

**यापुढें भुईमूग व भुईमुगाच्या तेलाची निर्यात बंद**

भुईमूग आणि भुईमुगाचें तेल यांची आतांपर्यंत झालेली रवानगी आणि पुढील कांही महिन्यांत रवानगी करण्यासाठीं नोंद झालेला सांठा॰ विचारांत घेऊन त्यांच्या निर्यातीबाबतच्या परिस्थितीचा भारत सरकारनें फेरविचार केला आहे आणि मुंबई-कलकत्ता, आणि मद्रास या ठिकाणच्या निर्यात परवाने देणाऱ्या अधिकाऱ्यांनीं भुईमुगाचें तेल आणि एच. पी. एस. भुईमूग यांच्या विक्रीची नोंद करून घेऊं नये असें ठरविलें आहे.

---

**ब्रिटनमधील पोलादाचें उत्पादन**— ब्रिटनमधील खाजगी मालकीच्या पोलादाच्या कारखान्यांवर राष्ट्रीयीकरणाच्या कायद्यान्वयें १५ मे, १९५१ पासून निर्बंध घालण्यांत येणार आहेत. त्या तारखेनंतर पोलादाच्या कित्येक प्रकारांचें उत्पादन खाजगी उद्योगधंद्यांना सरकारच्या परवानगीशिवाय करतां येणार नाहीं. वार्षिक ५,००० टनांपेक्षां कमी उत्पादन असणाऱ्या खाजगी कारखान्यांवरच वरील निर्बंध घातले जाणार आहेत.

**शिरगणती आणि पार्लमेंटचे सभासद**—भारताच्या मध्यवर्ती संसदेचे आणि राज्य संसदेचे जे सभासद असतील त्यांच्या पोटाच्या व्यवसायाप्रमाणें शिरगणतींत त्यांची गणना करण्यांत येणार आहे. जे सभासद सभासदत्त्वाच्या भत्त्यावरच आपली गुजराण करीत असतील ते आर्थिक दृष्ट्या 'अचेतन' गणण्यांत येणार असून त्यांना सेवानिवृत्तांच्या सदरांत घालण्यांत येणार आहे.

**अमेरिकन नागरिकांवरील करांचा विनियोग**—प्रे. ट्रुमन ह्यांनीं १४ जानेवारीला कॉंग्रेसपुढें अमेरिकेचें अंदाज-पत्रक मांडलें. ह्या अंदाजपत्रकांत अमेरिकन नागरिकांवर अधिक कर बसविण्यांत आले आहेत. प्रत्येक डॉलर करापैकीं ६८ टक्के आंतरराष्ट्रीय सुरक्षिततेसाठीं, ७ टक्के सैनिकांसाठीं आणि २५ टक्के राष्ट्राचा गाडा चालविण्यासाठीं खर्च होणार आहेत.

**अधिक कोळसा निर्माण करा**—ब्रिटनमध्यें सध्यां कोळशाचा तुटवडा जाणवूं लागला आहे. हा तुटवडा भरून काढण्यासाठी १९५१ च्या पहिल्या चार महिन्यांत ३० लाख टन जादा कोळसा उत्पादन करावा अशी विनंति ब्रिटनचे मुख्यप्रधान मि. ॲटली ह्यांनीं केली आहे. खाणी कामगारांच्या कार्यकारी मंडळाकडून कोळशाच्या उत्पादनाबाबत सहकार्याचें आश्वासनहि मिळालें आहे.

**पाकिस्तानला चीनचा कोळसा**—भारताबरोबर तंटा चालू असल्यानें पाकिस्तान त्याला लागणारा कोळसा परदेशाहून मागवितें. द. आफ्रिका व पोलंड ह्यांच्याकडून कोळसा घेण्याचे करार पूर्वींच झाले आहेत. आतां उत्तर चीनमधील कोळसा आयात करण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. कोळशाच्या वहातुकीसाठीं लागणारी जहाजेंही मिळालीं आहेत. कोळसा चितगांव बंदरांत उतरविण्यांत येईल.

**पुणें कॉर्पोरेशनचें अंदाजपत्रक**—पुणें कॉर्पोरेशनच्या सल्लागार समितीनें कॉर्पोरेशनचे १९५१–५२ सालचें अंदाज-पत्रक मंजूर केलें आहे. कॉर्पोरेशनचें उत्पन्न ह्या वर्षी ९९ लक्ष, ९० हजार रुपये आणि खर्च १ कोटी, ४ लक्ष, २२ हजार, ७२० रुपये होईल, असा अंदाज करण्यांत आला आहे. वर्षारंभीची १३ लक्ष, २ हजार रुपये शिल्लक लक्षांत घेतली तर अंदाजपत्रक तुटीचें होत नाहीं.


फोनः ३४५१९ तारः SAHYOG

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना
असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं,
कातडीं कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन.
टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लांकूड आणि कोळसा वगैरे.



**दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई,
स्थापना साल १९११

चेअरमनः—श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| मागितें भांडवल | रु. ४८,२६,००० |
| गंगाजळी फंड | रु. ३३,४१,००० |
| ठेवी | रु. ८,६९,९७,००० |
| खेळतें भांडवल | रु. १०,४३,९३,००० |

**१५ जिल्ह्यांत ६५ शाखा**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.